Shree Mahavir
Education Society's
Institute of Technology
Polytechnic
Nashik

# माहितीपत्रक

## जात पडताळणी करीता

**लागणारी आवश्यक कागदपत्रे साक्षांकीत (XEROX Attested) करून खालील क्रमानुसार जोडणे आवश्यक आहे.**

**अ) प्राथमिक महत्वाचे पुरावे :-**

१) पासपोर्ट फोटो १ (बोनाफाईडकरिता)

२) अर्जदाराच्या प्रवेशाचे DTE यांचे Allotment/Inst.Confirmation Letter.

३) अर्जदाराचे प्राथमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र /शाळा नोंदवहीचा उतारा

४) अर्जदाराचा जन्माचा दाखला

५) अर्जदाराचा जातीचा दाखला

६) अर्जदाराचे वडील,चुलते, आत्या, आजोबा, पंजोबा, खापर पंजोबा,यांचे प्राथमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / शाळा नोंदवहीचा उतारा/गाव नमुना नं. १४ उतारा (तहसिल रेकॉर्ड विहित नमुन्यातील)

७) अर्जदाराचे वडील,चुलते, आत्या, आजोबा, पंजोबा, खापर पंजोबा,यांचे जात प्रमाणपत्र असल्यास जात प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

८) अर्जदाराच्या रक्ताच्या नातेवाईकांची जात प्रमाणपत्र पडताळणी झाली असल्यास वैधता प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

९) वंशावळीचे शपथपत्र मूळ प्रत (रू १००/- च्या स्टॅंप पेपरवर)

१०) इतर अधिक पुरावे. शाळा प्रवेश निर्गम उतारा, ७/१२ उतारा, वारस नोंद, गाव नमुना नं. ६ ड, कडई पत्र, वाटणी नोंद, हक्काचे पत्रक, फेरफार नोंद, इ. (तहसिल रेकॉर्ड नुसार)

- **टीप- वरील कागदपत्रांवर अर्जदाराचा दाखला,वडीलांचा दाखला, चुलत्यांचा दाखला, आत्याचा दाखला, आजोबांचा दाखला, पंजोबांचा दाखला, असे त्या त्या दाखल्यावर स्पष्टपणे लिहावे.**

**ब) दुय्यम महत्वाचे पुरावे :-**

*** (प्राथमिक पुरावे उपलब्ध नसले तरच दुय्यम पुरावे जोडावेत)**

१) वडील /काका /आत्या /आजोबा अशिक्षित असल्यास त्यांचा जन्म/मृत्यु नोंदवहीचा उतारा (यालाच गाव नमुना - १४) असे म्हणतात व हा दाखला तहसिलदारांकडे मिळतो. **किंवा** वरील कागदपत्रांमध्ये जातीचा उल्लेख नसल्यास महसुली दस्तऐवज, जुने खरेदी विक्री दस्त (Sale Deed) ज्यात जातीचा उल्लेख आहे.

२) अर्जदाराच्या जात प्रमाणपत्राच्या दाव यापुष्ट यर्थ, अन य कोणतेही संबंधित पुरावे / दस्तऐवज.

**पुरावे जोडणेसंबंधी सुचना:-**

१. इतर मागास **(OBC)** प्रवर्गासाठी सन १९६७ पूर्वीचे पुरावे जोडावे. कुणबी जातीसाठी सन १९२० नंतरचे व १९६७ पूर्वीचे पुरावे जोडावेत.

२. अनुसुचित जाती **(SC)** साठी सन १९५० पूर्वीचे पुरावे जोडावेत.

३. विमुक्त जाती, भटक या जमाती **(VJ/NT)** संबंधी १९६१ पूर्वीचे पुरावे जोडावेत.

४. विशेष मागास **(SBC)** प्रवर्गाकरीता सन १९९५ पूर्वीचे पुरावे जोडावेत.